# श्री आद्य शंकराचार्य यांच्या षट्पदीचे मराठी रूपांतर

(संस्कृत भावानुवाद)

अविनय निवार विष्णो विषयतृषा शमव करि मनोदमन
भूतदया विस्तारी तारी संसारसागरातून ॥ १ ॥
मकरंद स्वर्गंगा जयात परिमलहि सच्चिदानंद
वंदन पदारविंदां श्रीपतिच्या त्या, घडो भवोच्छेद ॥ २ ॥
मी तू भेद नुरे तरि देवा ! मी तव, कदापि तू मम न
न कधी जलधी तरंगी, तरंग जलधीत हो सदा लीन ॥ ३ ॥
उद्धृतनग ! नगभिदनुज ! दनुजकुलामित्र !मित्रशशिनयन !
नयनां मम तू दिसता प्रभो ! भवोद्वेग संभवे मग न ? ॥ ४ ॥
मत्स्यादिक अवतारी अनेकदा तारिलेत वसुधेला
बावरलो भवतापे, प्रभुजी ! आता तुम्हीच सांभाळा ॥ ५ ॥
दामोदर ! गुणमंदिर ! सुंदरवदनारविंद ! गोविंद !
भवजलधिमथनमंदर ! मदीय गंभीर हरण करि खेद ॥ ६ ॥
नारायण ! करुणामय ! आलो शरण त्वदीय चरणांस
वदनसरोजी माझ्या संतत ही षट्पदी करो वास ॥ ७ ॥

*****

वैद्य श्रीनिवास पु. हिर्लेकर

**(By: Vaidya Shriniwas P. Hirlekar)**